INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# महात्मा ज्योतीबा फुले यांचे आदर्श शैक्षणिक विचार

**प्रविण गणेशराव लोखंडे**

संशोधक विद्यार्थी

(एम.ए) मराठी भाषा विभाग

ई-मेल: lokhandepravin38@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/07.2021-36882954/IRJHIS2107004

***संक्षिप्त गोषवारा:***

*महाराष्ट्राच्या उज्ज्वल व भव्य दिव्य इतिहासात अनेक सर्वश्रेष्ठ समाजसुधारक होवुन गेले. आपल्या आदर्श विचारातुन तसेच कृती पध्दतीतुन सर्वच समाजसुधारकांनी अनिष्ठ रूढी, परंपरा अंधश्रध्दा याला कडाडुन विरोध केला. व समाजाला एक वैचारीक दिशा, आदर्श सामाजीक प्रगल्भता प्राप्त व्हावी म्हणुन शिक्षणाच्या माध्यमातुन समाज विकासासाठी अनेक समाज सुधारकांनी आपले संपूर्ण जिवन समर्पीत केले होते. त्यापैकीच आपल्या शैक्षणिक कार्याच्या माध्यमातुन सामाजीक क्रांती घडवुन आणणारे महाराष्ट्रातील अग्रगण्य समाज सुधारक म्हणजेच महात्मा ज्योतीबा फुले होय. आधुनिक महाराष्ट्रातील मुलगामी समाज परिर्वनाच्या चळवळीचे ते आदय प्रवर्तक होते. महात्मा ज्योतीबा फुले हे कृतिशिल समाजसुधारक त्यांनी आपले विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये आणुन समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले. थॉमस पेन, विल्यम हंटर यांसारख्या विचारवंताच्या प्रभावाने प्रभावीत झालेले महात्मा फुले आपल्या अजोड व समाजहितदक्ष कार्यामुळे महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथरकिंग म्हणून सुपरिचीत झाले.*

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतीबा फुले (जन्म ११ एप्रिल १८२७ मृत्यु २८ नोव्हेंबर १८९०) हे थोर समाजसुधारक, लेखक, विचारवंत, शिक्षणतज्ञ होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापणा करून शेतकरी, अस्पश्य व बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवुन पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली त्यांच्या या अनमोल कार्यामुळे १९८८ साली मुंबईच्या जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली.

महात्मा ज्योतीबा फुले यांचा जन्म सातारा जिल्हयातील कटगुण या गावी ११ एप्रील १८२७ रोजी झाला. सुरूवातीला गोऱ्हे आडनावाने ज्यातीबांचे कुटूंब सुपरिचीतहोते पेशव्यांना फुले पुरविण्याचे काम त्याचे कुटूंब करीत असल्याने पुढे ते फुले या नावाने ओळखले जाऊ लागले.

**संशोधन लेखाचे उद्देश**

१. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक आदर्श विचार अभ्यासणे.

२. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक कार्ये जमजवुन घेणे.

३. सद्यस्थिती आणि महात्मा फुले यांचे शिक्षण विषयी मत अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध लेखाकरीता विविध संदर्भ ग्रंथ, वेगवेगळे पुस्तके, वर्तमानपत्र व नियतकालीकातील विविध लेख, इंटरनेवरील उपयोगी माहिती यासह अनेक संसाधनांचा वापर केला आहे. संशोधनाकरीता वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

**महात्मा फुले एक थोर समाजसुधारक:**

१९ व्या शतकात महाराष्ट्रात प्रारंभी समाज सुधारणेच्या विचारातुन अनेक सामाजीक संस्था उदयास आल्या याच समाज सुधारणेच्या आदर्श विचाराने प्रभावीत होवुन, 'सकल समाजाला शहाणे करून सोडावे' या दैदिप्यमान विचाराने म.फुले यांनी २४ संप्टेंबर १९७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तत्कालीन विचारांना अनुसरून सनातन वर्गाकडुन अन्याय , अत्याचारांपासुन, गुलामगिरीतुन समाजाची मुक्तता करणे, मानवाच्या हक्काची जाणीव करून देणे हाच सत्यशोधक समाजाची स्थापणा करण्यामाघील मुळहेतू होता त्याचबरोबर महाराष्ट्रात असलेली बालविवाह प्रथा, विधवा पुर्नविवाह विरोध, .अंधश्रध्दा जातीयता ह्या सारख्या अनिष्ठ रूढी परंपराना विरोध करून १९६३ मध्ये मानवी मुलभुत हक्कांना अनुसरून बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार :**

भारतीय प्रस्थापित उच्चवर्णीय लोकांनी खालच्या वर्गातील लोकांना शिक्षणापासुन वंचित ठेवले या करीता धर्म, जातीव्यवस्था, वर्ण व्यवस्था पुढे आणुन शुद्रातीशुद्राना फसविले त्यांना अंधारात ठेवले, त्यांच्यातील अज्ञानीपणाचा फायदा घेतला त्या संदर्भात म.फुले यांनी मनुस्मृतींला आव्हाण देऊन अशी घोषणा केली की,

"आत्ता तरीतुम्ही मागे घेऊ नका।
धिक्कारूनी टाकामनुमता।
विद्या शिकताच पावाल तेसुखा ।
घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे।।

अशा प्रकारे धर्म मार्तडांच्या वर्चस्वाला न जुमानता, पारंपरीक विचारसरणीची चौकट मोडुन समाज परिवर्तनासाठी 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचा उध्दारकरी'हा विचार महात्मा फुले यांनी आपल्या स्त्री शिक्षणकार्याचा लोकमंत्र मानला .

**१. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार:**

स्त्रियासाठी शिक्षणची दारे कायमची उघडली जावी म्हणुन म.फुले यांनीस्त्री शिक्षण मोहीम सर्वप्रथम हाती घेतली. स्त्रियांच्या सर्वोगीण विकासासाठी तसेच सक्षम स्त्री घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखुन सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देवुन आदय शिक्षीका म्हणुन कार्यास सुरूवात केली व स्त्री शिक्षणाची मुहर्तमेढ रोवली गेली.

**२. सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण:**

भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरीक म. फुले होते. ही मागणी त्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगासमोर साक्ष देतांना मांडली. प्राथमिक शिक्षण, उज्ज्वल भविष्याचा व सामाजीक विकासाचा पाया आहे हे त्यांनी अनेक उदाहरणासह स्पष्ट करून त्याचे महत्व अधोरेखित केले.

**३. शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल:**

म. फुले यांच्या मतेआजची शिक्षण पध्दतीही बहुजन समाजाला शिक्षणापासुन वंचीत करणारी आहे तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर त्यांनी दिला. केवळ कारकुन वर्ग तयार करणाऱ्या वर्गाची निर्मिती शिक्षणातुन होऊ नये तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनविणारे उदयोगी जिवन उपयोगी शिक्षण देण्यात यावे.

**४. त्रिभाषा सुत्राचा अवलंब:**

(१९६४-६६) च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सुत्रास जरी आजच्या कालावधीत मान्यता दिलेली असली तरी या अगोदर ७७ वर्षापुर्वी महात्मा फुले यांनी त्रिभाषा सुत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता.

**५. शिष्यवृत्ती व वसतीगृहाची सुविधा :**

जनसामान्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, ह्यासाठी खेड्यापाड्यातील जनतेला शिक्षणाची दारे खुली व्हावी म्हणुन वसतीगृहाची व्यवस्था करण्याची आदर्श कल्पना म.फुले यांनी मांडली.

**६. प्रशिक्षीत शिक्षकांची तरतुद:**

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाल्यावर विद्यार्थी संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होण्याची शक्यता होती आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षीत शिक्षक असणे देखील आवश्यक आहे. हा प्रभावी विचार मांडणारे द्वारे महात्मा जोतीबा फुले एकमेव व्यक्ती होते.

**७. राष्ट्र निर्मीतीसाठी शुद्रांना शिक्षण:**

राष्ट्र उभारणीमध्ये बहुजन समाज शिक्षणापासुन अलिप्त आहे याची जाणीव त्यांना होती त्यांच्या उध्दारासाठी शिक्षणहा एकमेव मार्ग आहे शुद्रातिशुद्रांना शिक्षण देवुन सुशिक्षीत केल्याशिवाय राष्ट्राची प्रगती होणार नाही त्यासाठी शिक्षाणाची दारे सर्वासाठी खुली झाली पाहिजे यावर त्यांचा विशेष भर होता.

**८. तेजस्वी लेखनीने शिक्षणाचे महत्व अधोरेखीत:**

आपल्या तेजस्वी आणि धारदार लेखणीने शिक्षणचे महत्व त्यांनी आपल्या अनेक ग्रंथात स्पष्ट केले समाजात असणाऱ्या अनिष्ठ रूढी, परंपरा, कर्मकांड, वर्ण व्यवस्था, जातीभेद, अंधश्रध्दा, प्रवृत्ती हया केवळ निरक्षरतेमुळेच असु शकतात. यामुळे शिक्षण घेणे क्रमप्राप्त आहे म्हणुन महात्मा फुले शेतकऱ्याचा आसुड या ग्रंथात म्हणतातकी,

विदयेविना मतीगेली।
मती विना नितीगेली।।
नीतीविना गतीगेली।
गतीविना वित्त गेले।।
वित्तविना शुद्रखचले।
इतके अनर्थ एका अविदयेने केले।।

शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरीता शिष्यवृत्ती तसेच परिक्षेत बक्षिस असावे व सरकारनी स्थानिक निधी मधील ५०% निधीहा प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा. नगर पालीकांनी स्वर्खर्चाने शाळा चालवाव्यात व विद्यार्थ्यांना ज्ञानदानाकरीता शिक्षकहा प्रशिक्षीत आणि शेतकरी वर्गातील असावा हा तेजस्वी दुरदृष्टीचा विचार महात्मा ज्योतीबा फुले यांनी मांडला .

**९. बोले तैसा चाले,त्यांची वंदावी पाऊले:**

आपल्या तेजस्वी विचाराला अजोड कृतीची जोड देवून म. फुले यांनी महाराष्ट्रात १८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेत भिडे यांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा स्थापन करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली सावित्रीबाई फुले यांना स्वत: शिकवुन शिकवणीसाठी तयार केले. त्यानंतर महात्मा फुले यांनी १८५१ मध्ये पुण्यातच नाना पेठेत अस्पश्यांची पहिली शाळा सुरू केली शुद्राना शिक्षणाचा अधिकार नव्हता म. फुलेंनी अपार कष्ट, मेहनत घेऊन हा शिक्षणाचा महत्वपूर्ण अधिकार मिळवुन दिला आणि पुण्यात आनखी दोन शाळा सुरू करून सेवेचे हे अविरत व्रत आनखी जोमाने चालु ठेवले.

**समारोप :**

महात्मा फुले यांनीस्त्री शिक्षणाचे महत्व ओळखुन स्त्री शिक्षण विषयक चळवळ अधिक गतीमान करण्यासाठी अपार कष्ट घेतले म. फुले म्हणतात कि, पुरूषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक गरज आहे कारण स्त्रिया आपल्या मुलांना बालपणात जे संस्कार लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात शुद्राति शुद्र स्त्रियांना खरा मानव धर्म कळावा त्याच बरोबर न्याय ,अन्याय, समजावा कर्म-अकर्म समजावे, अधर्म-धर्म कळावा, सत्य-असत्य समजावे, आपले कर्तव्य आणि हक्क याची जाणीव व्हावी या दुरदृष्टीने स्त्रीयाना पहिल्यांदा शिक्षण दिले पाहिजे सर्व समाजाने शिक्षित होऊन अंधश्रध्देला, कर्मकांडाला तिलांजली देवुन मानवविकास साधावा म्हणून म. फुले म्हणतात.,

"स्त्री-पुरूष सर्व कष्टकरी व्हावे

कुटूंब पोसावे । आनंदाने ।।१।।

नित्य मुला-मुलींना शाळेत घालावे

अन्नदान द्यावे विदयार्थ्यांस ।।

शिक्षण हे जिवन विकासासाठी असते, मानसाच्या सर्वांगीण व्यक्तीमत्वाचा विकास शिक्षणामुळे होतो सुप्तगुण फुलतात, बहरतात हा शिक्षण विषयक आधुनिक दृष्टीकोन क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांचा होता.

**संदर्भ:**


**१)** धनंजय किर (१९६८) महात्मा ज्योतीराव फुले -आमच्या समाजक्रांतीचे जनक

**२)** डॉ. अनिल कठारे -(२०१३) -.आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, औरंगाबाद

**३)** दिलीप सुरवाडे (२००९) -महात्मा फुले शैक्षणिक विचार व कार्य - लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद

**४)** हरी नरके, य.दी. फडके - महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड १

**५)** प्रभाकर वैदय (१९७५) - महात्मा फुले व त्यांची परंपरा, मुंबई

**६)** नियतकालिके

१. लोकराज्य

२. योजना